शासकीय अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास उत्कृष्ट कामानिमित्त आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९०/प्र.क्र. ३९५/आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ नोव्हेंबर १९९०.

वाचा:- [१] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७२/ड, दिनांक ११ फेब्रुवारी १९७४.

[२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७६/१३, दिनांक १० ऑगस्ट १९७६.

[३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०८४/के.नं. ६/आठ, दिनांक १९ फेब्रुवारी १९८४.

परिपत्रक:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०८४/के.न. ६/आठ, दिनांक १९ फेब्रुवारी १९८४ अन्वये विहीत केलेले विवरणपत्र सुधारण्याचा प्रश्न या विभागाच्या विचाराधीन होता. या विभागाने सर्वंकष विचार करून आवश्यक सुधारणा केल्या असून सदरचे सुधारित विवरणपत्र यासोबत जोडले आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभाग व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव करताना सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील बाबी विचारात घ्याव्यात. तसेच वर्ग १ व वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना, आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे पाठविताना या परिपत्रकान्वये विहीत केलेल्या विवरणपत्रातील माहिती, संबंधित अधिकाऱ्याच्या अद्यावत गोपनीय अहवालाच्या नस्तीसह पाठवावी.

जिल्हाधिकारी कार्यालय,
आवक
1583
15 DEC 1990
शाखा -
प्रति


महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा.गो. दाभोळकर,
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख.

[क.मा.प.]

## विवरणपत्र

### अत्युत्कृष्ट कामानिमित्त आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबत

१. शासकीय अधिकारी/कर्मचा-याचे नाव:

२. जन्म तारीख:

३. [अ] सध्या धारण केलेले पद:

[ब] या पदाची वेतनश्रेणी:

[क] सध्याचे मूळ वेतन:

[ड] हे पद धारण केल्याची तारीख:

४. [अ] ज्या पदामध्ये आगाऊ वेतनवाढीचा विचार करता येईल ते पद:

[ब] त्या पदाची वेतनश्रेणी:

[क] त्या पदावरील नियुक्तीचा दिनांक:

[ड] आगाऊ वेतनवाढीच्या दिनांकास मूळ वेतन:

५. यापूर्वी आगाऊ वेतनवाढ मंजूर केली असल्यास कोणत्या पदामध्ये व त्याचा दिनांक [होय किंवा नाही हे स्पष्ट करण्यात यावे, असल्यास त्याचा दिनांक देणे आवश्यक आहे]:

६. विभागीय चौकशी चालू असल्यास अथवा चालू करण्याचे प्रस्तावित असल्यास तसे नमूद करावे:

७. संबंधित व्यक्तीचे प्रकरण पुनर्विलोकन समितीपुढे आहे किंवा कसे:

उप सचिव, महाराष्ट्र शा